महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर. जुने मॉरीस कॉलेज ईमारत, सिताबर्डी, नागपूर
(दुरध्वनी क्रमांक २५५४२१०/फॅक्स क्रमांक ०७१२-२५६१७१३)
Email : jdhengp@rediffmail.com

क्र.उशिनाग/शिष्यवृत्ती/पीएमएस/१०८०/२०१८ दिनांक २१/०२/२०१८

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक तंत्रशिक्षण, सदर,नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन,नागपूर
७. विभागीय उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
८. संचालक, शास./सर्व प्राचार्य अशासकीय अनु./विना अनु./कायम विना अनु. महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर
९. शिक्षणाधिकारी माध्यमिक नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/गोंदिया

**विषय** :- सन २०१८-१९ साठी National Scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी नविन महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत (अंतिम दिनांक ३१.३.२०१८)

**संदर्भ** :- उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१८-१९/१८८५, दिनांक १५/०२/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे यांचे १५/२/२०१८ च्या ई-मेल नुसार केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ च्या अंमलबजावणीसाठी ज्या महाविद्यालय/ संस्थेचे नाव National Scholarship Portal (www.scholarships.gov.in) च्या होम पेज वरील Search Institute/School/ ITI या लिंक वर गेल्यानंतर दिसत नसेल अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालय/ संस्थेची नाव नोंदणी दिनांक ३१.३.२०१८ पर्यंतच करणे आवश्यक आहे. याबाबतचे परिपत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/ विभागीय उपसंचालक/ शिक्षणाधिकारी माध्यमिक/विद्यापीठे यांनी सदरच्या सूचना आपल्या अधिनस्थ असलेल्या संस्था/ महाविद्यालयांना ई-मेल द्वारे तात्काळ निर्गमित कराव्यात.

**सोबत : परिपत्रकाची प्रत संलग्नीत**

A. M. Rahatgaonkar
(डॉ. अंजली रहाटगावकर)
सहसंचालक,
उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर

**प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांना माहितीस्तव**

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ...1541...
दिनांक 23 FEB 2018

महाराष्ट्र शासन
संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं/शिष्य/१८-१९/ १८८६ दिनांक 15 FEB 2018

**परिपत्रक**

विषय : सन २०१८-१९ साठी National scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी नविन महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत.
(अंतिम दिनांक ३१.३.२०१८)

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, अल्पसंख्याक कार्यमंत्रालय नवी दिल्ली यांचे दिनांक ०८.२.२०१८ च्या ई-मेल नुसार केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ च्या अंमलबजावणीसाठी ज्या महाविद्यालय/संस्थेचे नाव NSP Portal (www.scholarships.gov.in) च्या होम पेज वरील Search Institute/School/ITI या लिंक वर गेल्यानंतर दिसत नसेल अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालय/संस्थेची नाव नोंदणी दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत करणे आवश्यक आहे.

दिनांक ३१.३.२०१८ नंतर सदर पोर्टलवरील नविन नाव नोंदणीसाठीची प्रक्रिया बंद होणार आहे. त्यामुळे विहीत मुदतीनंतर नाव नोंदणीसाठी या संचालनालयाकडे महाविद्यालयांची माहिती प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

सदर पोर्टलवर ज्या महाविद्यालयांचे नाव दिसत नाही अशा महाविद्यालयांनी नाव नोंदविणेसाठी या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरील स्कॉलरशिप विभागातील केंद्रपुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांच्या लिंकवरील नविन महाविद्यालय/संस्था यांच्या नाव नोंदणीसाठी दिलेल्या विहीत नमुन्यातील विवरणपत्रातील (Formate for New institute /college registration) माहिती भरुन आवश्यक कागदपत्रांसह scholarshippms@gmail.com या ई मेलवर दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविणे आवश्यक आहे.

महाविद्यालय/संस्था यांच्या नाव नोंदणीसाठी येणाऱ्या अडचणीबाबत संचालनालयाच्या ०२०-२६१२६९३९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे -१.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई ४०० ००१.
३. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.
४. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे
५. मा. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे

Scanned by CamScanner